# जागतिक मृदा दिवस ५ डिसेंबर, २०२५
# निरोगी आरोग्यासाठी माती निरोगी असणे गरजेचे

---

कृषी विज्ञान केंद्र धुळे आणि कृषि महाविद्यालय धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने "जागतिक मृदा दिन" मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जागतिक मृदा दिनाचे औचित्य साधून युवकांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजिन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. बबनराव इल्हे (सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, धुळे) यांनी भूषविले. कार्यक्रमास डॉ. विक्रांत भालेराव (प्राध्यापक, मृद विज्ञान विभाग, कृषि महाविद्यालय, धुळे) डॉ. अतिश पाटील (मृदा शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, धुळे), डॉ. प्रसाद मरगळ आणि डॉ. निहाल तितीरमारे (सहाय्यक प्राध्यापक, मृद विज्ञान विभाग, कृषी महाविद्यालय, धुळे) उपस्थिती होते. कार्यक्रमाची सुरवाती मातीच्या पूजनाने केली.

डॉ. अतिश पाटील यांनी उपस्थितांना "जमीन आरोग्य व्यवस्थापनामध्ये युवकांचा सहभाग" याविषयी तांत्रिक मार्गदर्शन केले. कृषि रसायनांचा चुकीच्या आणि गरजेपेक्ष्य जास्त वापराने जमिनीची गुणवत्ता दिवसेंदिवस बिघडत आहे. जमिनीच्या आरोग्यावरच मानवाचे आरोग्य अवलंबून असते. ते टिकवण्यासाठी कृषि विद्यापीठांनी संशोधित केलेल्या शिफारशींचा अवलंब तंतोतंत करणे गरजेचे आहे असे ते म्हणाले.

डॉ. विक्रांत भालेराव यांनी आपल्या प्रास्ताविकातून जागतिक मृदा दिवसाचे महत्त्व सांगितले. प्रत्येक वर्षी एक नवीन ब्रिद घेऊन हा दिवस साजरा केला जातो. ह्या वर्षाचा जागतिक मृदा दिवस हा निरोगी शहरांसाठी निरोगी माती या संकल्पनेवर साजरा केला जात आहे असे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षणीय भाषणात डॉ. बबनराव इल्हे यांनी निरोगी आरोग्यासाठी जमिनीची काळजी घेण्याचे आवाहन केले. रासायनिक खते आणि विविध कृषि रसायनिक निविष्टांच्या चुकीच्या वापरामुळे जमिनीचे आरोग्य दिवसेंदिवस बिघडत आहे. त्यामुळे विषमुक्त अन्न आपल्या वाट्याला येत आहे. जमिनी निरोगी राहिल्या तरच आपण निरोगी राहू असे ते म्हणाले.

युवकांनी कृषि माहिती तंत्रज्ञान केंद्र, गांडूळखत निर्मिती युनिट आणि नैसर्गिक शेती प्रकल्पाला भेट दिली. डॉ. अतिश पाटील यांनी घानामृत, बिजामृत, जीवामृत, नीमास्त्र, दशपर्णी अर्क इ. नैसर्गिक निविष्टा निर्मितीचे कृती प्रात्येक्षिक युवकांना दाखविले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सत्यजित मुळे व आभार डॉ. प्रसाद मरगळ यांनी मानले. सदर कार्यक्रमास मृद विज्ञान विभागाचे विध्यार्थी, शास्त्रज्ञ, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.






कृषि विज्ञान केंद्र